**महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,**
(महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम, १९८३ मधील कलम १२ नुसार स्थापित)
**आय्एस्ओ ९००१ : २००८ मानांकित संस्था**
**१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.**
**ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com** **दूरध्वनी (०२०) २५५३ ७६८८.**
**संकेतस्थळ : www.mcaer.org** **फॅक्स (०२०) २५५३ ३७६४.**

जा.क्र. मकृप/शिक्षण-१/४३१७/२६७३ दि. ३ नोव्हेंबर,२०१७

## परिपत्रक

**विषयः- शिष्यवृत्तीसंदर्भात सर्व महाविद्यालयांना सूचना**

सन २०१७-१८ पासून महाराष्ट्र शासनातर्फे सर्व प्रकारच्या शिष्यवृत्तीसाठी एकत्रित संकेतस्थळ विकसित करण्यात आलेले आहे. महाडीबीटी हे या संकेतस्थळाचे नाव असून https://mahadbt.gov.in हे संकेतस्थळ संचालक, माहिती व तंत्रज्ञान (DIT) यांचेमार्फत कार्यान्वित करण्यात आले आहे. सामाजिक न्याय विभागाच्या शिष्यवृत्ती / शिक्षण फी / परीक्षा फी / विद्यावेतन / निर्वाह भत्ता वितरित करावयाच्या योजनांचा समावेश या संकेतस्थळामध्ये करण्यात आला आहे.

विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्यासाठी ऑनलाईन अर्ज भरण्याबाबत समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी आवाहन प्रसिध्द केलेले आहे. सदर आवाहनाची प्रत यासोबत जोडली आहे. यामध्ये महाविद्यालयांसाठी सुध्दा सूचना दिलेल्या आहेत. त्याप्रमाणे महाविद्यालयांनी त्यांच्यास्तरावर कार्यवाही करावी.

विषयाधीन प्रकरणी संचालक, माहिती तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेसमवेत दि.२/११/२०१७ रोजी झालेल्या बैठकीमध्ये सूचित केल्याप्रमाणे कृषी विद्यापीठांतर्गत सर्व विद्यालये / महाविद्यालयांचे आयडी व पासवर्ड या कार्यालयास प्राप्त होणार असून या कार्यालयाने सदर आयडी व पासवर्ड संबंधित विद्यालय / महाविद्यालयास ई-मेलद्वारे द्यावयाचे आहेत.

उक्त कार्यवाहीसाठी सर्व विद्यालय / महाविद्यालयांचे ई-मेल पत्ते अद्ययावत असणे गरजेचे आहे. ही बाब विचारात घेता, राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत कार्यरत असलेल्या विद्यालय

/ महाविद्यालयांना या परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात येते की, त्यांनी आपल्या विद्यालय / महाविद्यालयाचे ई-मेल पत्ते या कार्यालयास त्वरीत ई-मेलद्वारे पाठवावेत.

संचालक, माहिती तंत्रज्ञान विभाग यांच्याकडून विद्यालय / महाविद्यालयांचे आयडी, पासवर्ड प्राप्त होताच ते संबंधित महाविद्यालयांना त्यांनी दिलेल्या ई-मेल पत्त्यावर पाठविण्यात येतील.

**स्वाक्षरीत/-**
**संचालक (शिक्षण)**

प्रतः-

१. मे. कल्प टेक्नॉलॉजीज प्रा.लि., शॉप १ व २, राधाकांत को-ऑप हौसिंग सोसायटी, रामबाग कॉलनी, कृष्णा हॉस्पीटलसमोर, पौड रोड, पुणे ४११ ०३८

राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत विद्यालये / महाविद्यालयांमध्ये सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षातील प्रवेश प्रक्रिया आपल्यामार्फत राबविण्यात आलेली असून सर्व विद्यालये/ महाविद्यालयांचे भ्रमणध्वनी आपणाकडे उपलब्ध आहेत. मोठया प्रमाणावर (bulk SMS) भ्रमणध्वनी संदेश पाठविण्याची या कार्यालयाकडे यंत्रणा नाही. यास्तव आपणास विनंती करण्यात येते की, कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर सदर परिपत्रक उपलब्ध केलेले असल्याचे भ्रमणध्वनी संदेश सर्व विद्यालय / महाविद्यालयांना देवून सहकार्य करावे. सदर कार्य आपणाकडून विनाशुल्क अपेक्षित आहे.

२. मे. जे. डी. आय. एन. सॉफ्ट, आरएच-७, प्लॉट क्र. ६१, सेक्टर क्र. १६, पीसीएनटीडीए, चिखली, पुणे ४११ ०१९.

यांना सूचित करण्यात येते की, सदर परिपत्रक कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात यावे.